**अति महत्वाचे**

जा.क्र. संसं/टिए/388 /२०१९
संशोधन संचालनालय,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला दिनांक : 26/06/2019

प्रति,

________________________________
________________________________
________________________________

विषय : ६५ व्या विभागीय संशोधन व विस्तार सल्लागार समिती (पश्चिम विदर्भ विभाग) खरीप २०१९ सभेचा इतिवृत्तांत.

पश्चिम विदर्भ विभागाची खरीप २०१९ हंगामाकरीता ६५ व्या विभागीय संशोधन व विस्तार सल्लागार समितीची बैठक दिनांक १८.६.२०१९ रोजी समिती सभागृह, कृषि महाविद्यालय, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथे संपन्न झाली. सभेचा इतिवृत्तांत कार्यवाहीकरिता सोबत जोडला आहे.

सभेत घेतलेले निर्णय परिशिष्ट-१ मध्ये दिलेले आहेत तरी आपल्या विभागाशी संबंधीत निर्णयावर योग्य कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल ह्या कार्यालयास त्वरीत पाठवावा.

संशोधन संचालक,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला

प्रतिलिपी,
१. मा. कुलगुरु, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला ह्यांना माहितीकरिता सविनय सादर.
२. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे यांना माहिती करिता सादर
३. व्यवस्थापकीय संचालक, महाबीज, अकोला
४. संचालक, विस्तार, विस्तार संचालनालय, कृषि व सहकार विभाग, कृषि विस्तार भवन (आयएआरआय कॅम्पस,) पुसा, नवी दिल्ली - ११००१२.
५. मा. कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. संचालक, संशोधन/विस्तार, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, १३२ ब, भांबुर्डा, भोसले नगर, पुणे-७.
७. संचालक, विस्तार शिक्षण, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
८. अधिष्ठाता, कृषि/कृषि अभियांत्रिकी, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला
९. विभागीय कृषि सहसंचालक, अमरावती विभाग, अमरावती
१०. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अकोला/अमरावती/बुलढाणा/वाशिम.
११. प्रकल्प संचालक, आत्मा, अकोला/अमरावती/बुलढाणा/वाशिम.
१२. कार्यकारी अभियंता, सिंचन विभाग, (संशोधन), अकोला/अमरावती/बुलढाणा/वाशिम.
१३. उपवनसंरक्षक अकोला/अमरावती/बुलढाणा/वाशिम.
१४. जिल्हा मत्सव्यवसाय अधिकारी, अकोला/अमरावती/बुलढाणा/वाशिम.
१५. उपसंचालक, पशुसवंर्धन व दुग्धशास्त्र, अकोला/अमरावती/बुलढाणा/वाशिम.
१६. उपसंचालक, सामाजिक वनिकरण, अकोला/अमरावती/बुलढाणा/वाशिम.
१७. कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला/अमरावती/बुलढाणा/वाशिम.
१८. विभाग प्रमुख, (सर्व) डॉ.पंदेकृवि, अकोला
१९. वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ, (सर्व)/प्रभारी अधिकारी, संशोधन केन्द्र, (सर्व), डॉ.पंदेकृवि, अकोला
२०. उपसंचालक (बियाणे), डॉ. पंदेकृवि, अकोला
२१. विस्तार विद्यावेत्ता, अकोला/अमरावती/बुलढाणा/वाशिम.
२२. कार्यक्रम संमन्वयक, कृषि विज्ञान केंद्र,बुलढाणा/अकोला/करडा(रिसोड)/घातखेड/दुर्गापूर/जळगाव जामोद

# पश्चिम विदर्भ विभागीय संशोधन व विस्तार सल्लागार समितीच्या

# ६५ व्या सभेचा कार्यवृत्तांत

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठामध्ये विभागीय संशोधन व विस्तार सल्लागार समितीची ६५ वी सभा, मा. डॉ. विलास भाले, कुलगुरु यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १८ जून, २०१९ रोजी संपन्न झाली. सभेसाठी कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक, डॉ. विलास खर्चे, विस्तार शिक्षण संचालक, डॉ दिलीप मानकर, अमरावती विभागाचे विभागीय कृषि सहसंचालक श्री. सुभाष नागरे, यांची उपस्थिती लाभलेली होती. संशोधन संचालक, डॉ. विलास खर्चे यांनी प्रास्ताविकपर भाषणात खरीप हंगाम नियोजना संबंधी सभेचे महत्व विषद केले. यावर्षी अमरावती विभागात पाऊस अजुन सुरु झाला नाही त्यामुळे येणाऱ्या काही दिवसात पडणाऱ्या पावसानुसार पिकांच्या पेरणीचे नियोजन करावे. मागील वर्षी गुलाबी बोंडअळीच्या प्रभावी नियंत्रणासाठी नियोजन केले. त्याचप्रमाणे यावर्षी मका पिकावरील लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी नियोजन करण्यात येणार आहे असे नमूद केले. डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला च्या संयुक्त कृषि संशोधन व विकास समितीने मंजुरी प्राप्त वाण आणि तंत्रज्ञान शिफारसीमध्ये शेती पिकाचे २ वाण, कृषि अभियांत्रिकी विभागाचे ९ यंत्रे आणि ३१ शेती तंत्रज्ञानाचा अंतर्भाव असल्याची माहिती प्रास्ताविकातून विषद केली.

विभागीय कृषि सहसंचालक, श्री. सुभाष नागरे यांनी खरीप हंगामासाठी कृषि निविष्ठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध असल्याचे नमुद केले. अमरावती विभागातील शेती पावसावर अवलंबून असुन कृषि विभाग व कृषि विद्यापीठ संयुक्तपणे उन्नत शेती व समृध्द शेतकरी कार्यक्रम राबवत असून जिल्हा व तालुकानिहाय उत्पादकतेची उद्दिष्टे निश्चित केले आहेत. विद्यापीठाने दिलेले संशोधनाचा प्रसार करतांना कृषि विभागास काही अडचणी आल्यास दुर कराव्यात अशी अपेक्षा व्यक्त केली. गाव पातळीवर नियमीत शेती शाळा राबवून स्थानीक गरजे नुसार प्रगत तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचवावे. तसेच निर्यातक्षम शेतीच्या नियोजनावर विशेष भर देण्यात यावा. येणाऱ्या खरीप हंगामात नाविण्यपूर्ण तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या शेतावर पोहोचविण्यात यावे. कमी वेळेत तिव्रतेने पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे शेत तळ्यात संचयन करुन संरक्षित ओलीतासाठी वापर करावा. तसेच हवामान बदलाच्या दृष्टीकोणातून कमी कालावधीच्या जाती विकसीत करण्याबाबत सुचित केले.

अध्यक्षीय भाषणांत डॉ. विलास भाले, कुलगुरु यांनी यावर्षी पाऊस लांबणीवर पडल्यागुळे पीक पेरणीचे नियोजन त्वरीत करुन पुरेशी ओल झाल्याबरोबर नियोजनबध्द पेरणी करण्याचे सुचित केले. गरजु शेतकऱ्यांच्या गटांना प्रोत्साहन देवून मार्गदर्शन करुन उत्पादकता आणि उत्पन्न वाढवावे असे नमूद केले. रुंद-वरंबा-सरीवर पिकाची पेरणी करुन उत्पादन वाढविणे गरजेचे आहे. देशी वाणाची लागवडीसाठी प्रसार करावा, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी शेतीच्या जोडधंद्याला प्रोत्साहन देण्याची गरज आहे. सोयाबीन व कापूस पिकांऐवजी जास्त उत्पादन देणारे इतर पिके सुध्दा शेतकऱ्यांनी घ्यावे असे नमूद केले. पाण्याची उपलब्धता असेल तर ज्या पिकाला मागणी आहे त्यानुसारच पिके घेण्यावर भर देण्यावा यावा असे आव्हान केले.

तसेच मा. कुलगुरुंनी निर्यातक्षम कृषि उत्पादन वाढविण्यासाठी कृषि विद्यापीठ व कृषि विभागाने एकत्रित काम करण्यावर भर देण्याचे सुचित केले. तसेच वाढीव उत्पादनावर आधारित प्रत्येक जिल्ह्यात एक प्रक्रिया केंद्र असण्याची गरज व्यक्त केली. पीक उत्पादना सोबतच पौष्टीक अन्नद्रव्ये पिके घेण्याचे सुध्दा आव्हान केले. या मान्सुन हंगामात चांगला पाऊस येण्याची अपेक्षा व्यक्त करुन खरिप हंगामासाठी शुभेच्छा देवून अध्यक्षीय भाषणाची सांगता केली.

डॉ. राजेंद्र काटकर, सहयोगी संशोधन संचालक यांनी पश्चिम विदर्भ विभागाचा अहवाल व मागील सभेच्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाही अहवालाचे सादरीकरण केले.

कृषि हवामानाबाबत डॉ. अनिल करुणाकर, सहयोगी प्राध्यापक यांनी सन २०१८-१९ मधील पाऊसमानाची माहिती सभागृहाला दिली. तसेच यावर्षी जुलै महीन्यात सरासरी पाऊस अपेक्षित असून ऑगष्ट महिन्यात सरासरीपेक्षा ९६ टक्के राहण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे असे सभागृहाला सांगितले.

त्यानंतर, वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ, विभाग प्रमुख, विस्तार कृषि विद्यावेत्ता, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, यांनी अहवाल सादरीकरण व उपस्थितांना मार्गदर्शन केले.

**वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञांचे अहवाल**

वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ, कापूस, सोयाबिन, ज्वारी, कडधान्य, तेलबिया, संचालक कृषि पध्दती व पर्यावरण केंद्र, कृषि विद्यावेत्ता तणव्यवस्थापन यांनी सभागृहात अहवालाचे सादरीकरण करुन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकाऱ्यांनी उपस्थित केलेल्या बाबीवर योग्य मार्गदर्शन केले व विद्यापीठाद्वारे संशोधित पीक वाणांची व लागवड तंत्रज्ञानाची माहिती दिली.

**विभाग प्रमुखांचे अहवाल**

विभाग प्रमुखांनी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकाऱ्यांनी उपस्थित केलेल्या बाबीवर वेळोवेळी मार्गदर्शन केले. विभागप्रमुख, किटकशास्त्र यांनी २०१८-१९ मधील विविध पिकावरील किडींचा प्रादुर्भाव व खरीप पिकांवरील किडीच्या व्यवस्थापनाबाबत तसेच कपाशीवरील गुलाबी बोंडअळीच्या व्यवस्थापनाबाबत करावयाच्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल सादर केला. त्याचप्रमाणे मक्यावरील लष्करी अळीच्या व्यवस्थापनाबाबत माहिती दिली.

शेती मशागतीच्या उपयोगाच्या कृषि अवजारे विषयी माहिती विभाग प्रमुख, कृषि शक्ती व औजारे यांनी सभागृहास सादर केली. विभाग प्रमुख कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी यांनी आपल्या सादरीकरणातुन कृषि प्रक्रिया संदर्भातील विविध सयंत्राबाबत सभागृहास माहिती दिली. तसेच विभाग प्रमुख, फळशास्त्र व भाजीपाला शास्त्र यांनी फळे, भाजीपाला या संदर्भातील लागवड तंत्रज्ञानाबाबत माहिती दिली.

**विस्तार कृषि विद्यावेत्ता यांचे अहवाल**

जिल्हावार पीक परिस्थिती, सामुहिक प्रक्षेत्र भेट कार्यक्रम, आयोजित प्रशिक्षण वर्ग, कृषि मेळावे, शेतीदिन, गटचर्चा, निदान चमु भेटी इत्यादी बाबतची सविस्तर माहिती विस्तार कृषि विद्यावेत्ता, अकोला, अमरावती, बुलढाणा व वाशिम यांनी वैज्ञानिक दृष्टीकोनातून सभागृहास माहिती दिली. त्याचबरोबर शेतकरी बांधवांकडून कळविण्यात आलेल्या समस्या व त्यावर संशोधनाचे दृष्टीने अंमलात आणलेले उपाय यांची माहिती देखील सभागृहात सादर केली.

**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे अहवाल**

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अकोला, बुलढाणा, अमरावती व वाशिम यांनी संबंधित जिल्ह्याचे अहवाल वाचन केले. त्यामध्ये जिल्हावार खरीप पीक नियोजन आणि विविध योजनांची माहिती सभागृहास सादर केली.

**जिल्हा अकोला**

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अकोला यांनी अहवाल प्रस्तुती करतांना अकोला जिल्हयाची सर्वसाधारण माहिती, वार्षिक पर्जन्यमान, खरीप हंगामातील प्रमुख पिकांचे मागील वर्षीचे सरासरी क्षेत्र तसेच या वर्षीचे प्रस्तावित क्षेत्र, पिकांचा फेरबदल, तसेच खरीपातील पिकांच्या विविध वाणांची व्याप्ती इत्यादी माहिती सादर केली.

त्याचप्रमाणे कपाशीवरील गुलाबी बोंड अळी व मक्यावरील लष्करी अळीच्या व्यवस्थापनासाठी चारही जिल्हामध्ये येत्या हंगामामध्ये करावयाच्या नियोजनाविषयी चर्चा करण्यात येवून गावपातळीवर काटेकोर नियोजन व उपाययोजनांचा अवलंब करावा, असे नमुद करण्यात आले. तसेच खारपानपट्ट्यात पीक बदल बाबतीत नियोजन करुन त्या दृष्टिने उपाय योजना कराव्यात, असे नमुद करण्यात आले.

सन २०१९-२० च्या खरीप हंगामाकरीता अकोला जिल्हयात पिकनिहाय क्षेत्राचे नियोजन खालीलप्रमाणे राहील असे सांगितले.

**खरीप पिकांचे प्रस्तावित क्षेत्र** (क्षेत्र ०० हे.)

| अ. क्र. | पिकाचे नांव | सरासरी क्षेत्र | सन २०१८-१९ | सन २०१९-२० (प्रस्तावित क्षेत्र) |
|---|---|---|---|---|
| १ | ख. ज्वारी | २२७.०० | १२२ | १८६ |
| २ | बाजरी | २ | - | २ |
| ३ | मका | २ | ०.१५ | ५ |
| ४ | इतर | ०.५५ | - | २६ |
| ५ | तूर | ५८७.०० | ४७३ | ५८३ |
| ६ | मुंग | ३०१.०० | ३०७ | ३१४ |
| ७ | उडीद | १२०.०० | २३९ | २५२ |
| ८ | इतर ख. कडधान्य | ०.६९ | - | ९२ |
| ९ | तिळ | १० | ३ | ७ |
| १० | सुर्यफूल | ०.८५ | - | ५ |
| ११ | सोयाबीन | २०३० | १४६७ | १६५० |
| १२ | इतर | ०.५३ | - | २८ |
| १३ | कपाशी | १५२४ | १४३८ | १६५० |
| १४ | ऊस | ०.६३ | - | - |
| | **एकूण** | **४८०५** | **४२०८** | **४८००** |

**प्रत्याभरणः**

गेल्या तीन वर्षापासून माहे ऑगस्ट व सप्टेंबर मध्ये पावसाचा खंड येत आहे, त्यामुळे सोयाबीन पिकावर त्याचा विपरीत परिणाम होऊन उत्पादनात घट येत आहे. याबाबत ठोस उपाययोजना विद्यापीठाने संशोधनाअंती तयार केल्या आहेत काय?

खारपानपट्ट्यामध्ये ड्रेनेज लाईन ट्रीटमेंट बाबत सखोल संशोधन होऊन जलसंधारण बाबत एखाद्या स्ट्रक्चरची शिफारस करावी.

सेंद्रिय शेतीबाबत शेतकऱ्यांची आस्था वाढत असून सेंद्रिय शेतीमध्ये जैविक किटकनाशके, जैविक खते, सेंद्रिय खते उपलब्ध आहेत मात्र तणव्यवस्थापनाकरिता जैविक तणनाशक नसल्याने त्याबाबत योग्य ते संशोधन होण्याची गरज आहे.

खारपाणपट्ट्यासाठी शेततळे व्यतिरिक्त मृद व जल संधारणाचे अन्य उपाय संशोधना अंती शिफारसीत करावे.

तुर व हरभरा पिकात मर रोगामुळे बरेच नुकसान होते पेरणी पुर्व बिज प्रक्रिये व्यतिरिक्त वाढीच्या अवस्थेत मर रोगाने होणारे नुकसान टाळण्यासाठी तसेच हा रोग जैवतंत्रज्ञानाद्वारे नियंत्रित करता येऊ शकतो का याबाबत संशोधन झालेले आहे काय?

मान्सुनची उशिरा सुरुवात झाल्यास किंवा सुरुवातीला पेरणी योग्य पाऊस न झाल्यास मुग व उडीद ही पिके घेता येत नाहीत. यास्तव सदर पिकांमध्ये उशिरा पेरणीस योग्य असणारे वाण संशोधत व्हावे

**जिल्हा बुलडाणा**

बुलडाणा जिल्ह्याच्या अहवालामध्ये जिल्ह्याच्या सर्वसाधारण माहिती सोबत खरीप पिका खालील क्षेत्र, पर्जन्यमान व २०१९-२० मधील विविध सिंचन प्रकल्पाचे नियोजनाची आकडेवारी सादर केली.बुलडाणा जिल्ह्यासाठी खालील प्रमाणे खरीप पिक नियोजन प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

**खरीप पिकांचे प्रस्तावित क्षेत्र** (क्षेत्र ०० हे.)

| अ.क्र. | पिकाचे नांव | सरासरी क्षेत्र | सन २०१८-१९ | सन २०१९-२० (प्रस्तावित क्षेत्र) |
|---|---|---|---|---|
| १ | खरीप ज्वारी | ५६३ | ७४ | १२६ |
| २ | बाजरी | ३५ | ६ | ११ |
| ३ | मका | ६११ | १५६ | १८९ |
| ४ | इतर तृणधान्य | २ | १० | ० |
| ५ | तूर | ६५० | ८१८ | ७५३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | मुग | ५२५ | १८५ | २४५ |
| ७ | उडिद | ४८४ | २०७ | २३४ |
| ८ | इतर कडधान्य | ६ | ३ | ० |
| ९ | भुईमुग | ४ | ४ | ७ |
| १० | तिळ | ४१ | १० | १२ |
| ११ | सुर्यफूल | २१ | ०.०४ | १ |
| १२ | सोयाबीन | २०८३ | ४०१५ | ४०६३ |
| १३ | इतर तेलबिया | २ | ३ | ० |
| १४ | कापूस | २४४४ | १८६४ | १७४३ |
| १५ | ऊस | १७ | ३ | २ |
| | **एकूण** | **७४८८** | **७३५८** | **७३८६** |

**प्रत्याभरणः**

सिंचन व निचरा विभागाने, शेततळ्यातून सायफन पध्दतीने पिकांना पाणी देण्यासंदर्भात वर्तमानपत्रामध्ये लेख लिहून जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत माहिती पोहोचवावी.

बुलढाणा जिल्ह्याच्या ठिकाणी माळी प्रशिक्षणाकरिता सोयी उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

द्राक्ष लागवडी संदर्भात बुलढाणा जिल्ह्यात योग्य वातावरण आहे काय याचा उहापोह करुन सविस्तर माहिती देण्यात यावी.

**जिल्हा अमरावती**

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अमरावती यांनी त्यांचे अहवाल वाचनामध्ये अमरावती जिल्ह्यातील खरीप पिक नियोजन क्षेत्र पर्जन्यमान, पिकांचा फेरबदल, इत्यादीबाबतची माहिती सभागृहाला दिली.

**खरीप पिकांचे प्रस्तावित क्षेत्र** (क्षेत्र ०० हे.)

| अ.क्र. | पिकाचे नांव | सरासरी क्षेत्र | सन २०१८-१९ | सन २०१९-२० (प्रस्तावित क्षेत्र) |
|---|---|---|---|---|
| १ | खरीप ज्वारी | ३८६ | १६३ | २०० |
| २ | तुर | ११४१ | ११२८ | १२०० |
| ३ | मुग | ४४३ | २२३ | ३०० |
| ४ | उडिद | ५६ | ९३ | १६० |
| ५ | सोयाबीन | ३२३३ | २९१६ | २९५० |
| ६ | कापूस | १९३२ | २०९५ | २३०० |
| ७ | इतर | ८७ | - | ३ |
| ८ | भात | - | ७२ | ५० |
| ९ | बाजरी | - | - | ०.५० |
| १० | मका | - | ८३ | ९५ |
| ११ | खरीप भुईमुग | - | ८ | २० |
| १२ | खरीप तीळ | - | - | १ |
| १३ | खरीप सुर्यफुल | - | - | १ |
| १४ | ऊस | - | १ | - |
| | **एकूण** | **७२८१** | **६७८७** | **७२८१** |

**प्रत्याभरणः**

सोयाबीन पिकामध्ये अलीकडे अमरवेलचा प्रादुर्भाव वाढल्याने नियंत्रणाच्या उपाययोजना सुचवाव्यात.

राज्य शासनाने सेंद्रिय शेती धोरण स्विकारले असल्याने त्या धोरणांतर्गत सेंद्रिय शेतीचे प्रकल्प दिले जातात. त्यामध्ये पीकनिहाय सेंद्रिय निविष्ठा पॅकेज विद्यापीठाने तयार करुन द्यावे.

सोयाबीन पिकामध्ये पिवळा मोझॅकचे प्रमाण अलीकडे वाढत असल्याने जवाहरलाल विश्व विद्यालय, जबलपूर विद्यापीठाने सोयाबीनची २ वाण (जे.एस. २०-२९ व जेएस-२०-६९) विकसीत केले असून सदर वाण मुळकूज रोगासह पिवळा मोझॅक रोगाला प्रतिकारक्षम आहेत. त्यामुळे या वाणांचा पैदासकार बियाणे कार्यक्रम घेवून शेतकऱ्यांना वाण उपलब्ध करुन द्यावे.

धारणी चिखलदरा या भागात भरडधान्य (कोदो, कुटकी, सावा) मोठ्या प्रमाणात लागवड केले जातात. तरी या पिकाकरीता सुधारीत लागवड पध्दती व सुधारीत वाण उपलब्ध करुन देण्यात यावेत.

अमरावती जिल्ह्यात खारपान पट्ट्याचे क्षेत्र बऱ्याच प्रमाणात आहे. त्याला अनुसरुन सिमेंट बांधाची निर्मिती करण्याकरिता नविन मॉडेल तयार करण्यात यावेत.

खारपाणपट्यातील नाले गाळाने भरुन उथळ झालेले आहेत. शेतकरी लोकप्रतिनिधीकडुन खोलीकरण/रुंदी करण्याची मागणी आहे. त्या अनुषंगाने या मॉडेलचे सविस्तर अंदाजपत्रक आवश्यक आहे.

अमरावती जिल्ह्यात अंजनगांव तालुक्यात पानपिंपरीचे क्षेत्र मोठ्या प्रमाणावर असून तेथील स्थानिक वाणातून निवड पध्दतीने चांगल्या वाणाची निवड करुन नविन वाण विकसीत करण्यात यावे.

मुग/उडिद पिकामध्ये रासायनिक तणनाशकांची कोणतीच शिफारस नाही. मात्र बऱ्याच वेळी शेतकरी सोयाबीन पिकामध्ये वापरल्या जाणाऱ्या निवडक तणनाशकांचा वापर करतात. त्यामुळे या पिकावर विपरीत परिणाम दिसून येतो. तेंव्हा सोयाबीन पिकामध्ये मुग व उडिद आंतरपिकासाठी तणनाशकांची शिफारस होणे आवश्यक आहे.

अमरावती विभागातील संत्रा पिकामध्ये फळांना तडा जाणे ही विकृती आढळून येते. त्यामुळे फळांना तडा ह्या अन्नद्रव्य कमरता यामुळे जात आहे की, पाण्याचा अतिरिक्त ताण बसल्यामुळे जात आहेत याची कारणमीमांसा करणे गरजेचे आहे, ज्यामुळे उपाय योजना करणे सोपे होईल.

तुर अधिक सोयाबीन पीक आंतरपीक हे रुंद वरंबा सरी पध्दतीने घेतांना ४ ओळीनंतर १ ओळ तुरीची रुंद वरंब्यावर पेरणी करतांना घेतांना तांत्रिक अडचणी येतात. यावर मात करण्याकरिता कोणत्या प्रकारच्या बाबी तथा यंत्रामध्ये सुधार करावा याबाबत मार्गदर्शन/प्रात्यक्षिकाची आवश्यकता आहे.

अमरावती जिल्ह्यातील शेतकरी संत्रा लागवड ५ X ५ मी. घेत आहेत त्यामुळे प्रचलीत शिफारश ६ X ६ मी. ऐवजी ५ X ५ मी. अंतराचा अभ्यास करुन शिफारस देणे गरजेचे आहे.

चिखलदरा तालुक्यात स्ट्रॉबेरी पीक घेण्यात आले होते व यास प्रतिसाद सुध्दा चांगला मिळाला. म्हणून विद्यापीठाने या भागात स्ट्रॉबेरी लागवड शिफारस करावी अथवा याबाबत अभ्यास करुन कळवावे.

**जिल्हा वाशिम**

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, वाशिम यांनी जिल्ह्याची सर्वसाधारण माहिती, सिंचनाच्या सुविधा, पर्जन्यमान, पिकाखालील वियाणे बदल, पिकवाणांची व्याप्ती यावरील सविस्तर आकडेवारी सभागृहारा सादर केली.

**खरीप पिकांचे प्रस्तावित क्षेत्र** (क्षेत्र ०० हे.)

| अ. क्र. | पिकाचे नांव | सरासरी क्षेत्र | सन २०१८-१९ | सन २०१९-२० (प्रस्तावित क्षेत्र) |
|---|---|---|---|---|
| १ | सोयाबीन | २७५२ | २९०३ | २९०० |
| २ | तुर | ५२० | ४६२ | ६०० |
| ३ | कपाशी | २९७ | २६६ | २५० |
| ४ | मुग | १४७ | १०० | १५० |
| ५ | उडिद | १४९ | १३४ | २०० |
| ६ | ज्वारी | ११६ | २९ | ४० |
| ७ | तीळ | ३ | ०.८६ | ३ |
| ८ | इतर | १९ | ४७ | ७ |
| | **एकूण** | **४००६** | **३९४७** | **४१५०** |

**प्रत्याभरण:**

बीबीएफ यंत्राणे पेरणी करतांना सद्यस्थितीमध्ये चार फन आहेत. ट्रॅक्टरचलीत इतर पेरणी यंत्रास नऊ फन असतात. त्यामुळे बीबीएफ द्वारे पेरणी केलेले क्षेत्र ट्रॅक्टरचलीत यंत्रापेक्षा कमी क्षेत्र होते. त्यामुळे बीबीएफ सयंत्र नऊ फनी करणे योग्य राहिल याबाबत मार्गदर्शन मिळावे.

**विकास यंत्रणांचे अहवाल**

रेशिम किड संचालनालय, सामाजिक वनिकरण विभाग, सिंचन विभाग, डीआरडीए, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्य व्यवसाय विकास विभाग, वनविभाग व सहकार विभाग इत्यादी विकास यंत्रणांचे अधिकारी किंवा प्रतिनिधी सभेला उपस्थित नव्हते. या संदर्भात सभेचे अध्यक्ष मा. कुलगुरु यांनी नाराजी व्यक्त करत या संदर्भात पत्र व्यवहार करण्याचे सुचित केले.

**कृषि विज्ञान केंद्राचे अहवाल**

कृषि विज्ञान केंद्र, अकोला, घातखेड, करडा, बुलढाणा व जळगांव जामोद यांनी, २०१८-१९ मध्ये राबविण्यात आलेले कृषि विषयक विविध कार्यक्रम, बिजोत्पादन, यशोगाथा या संबंधी विस्तृत माहिती सभागृहाला सादर केली.

सभेचा समारोप करतांना मा.अध्यक्ष महोदयांनी येणाऱ्या खरीप हंगामाच्या दृष्टीने खालील मुद्यांवर भर दिला.

- शेतकऱ्यांचे आर्थिक परिस्थिती सुधारण्याच्या दृष्टीने त्यांना योग्य ते तंत्रज्ञान उपलब्ध करुन देऊन या दृष्टीने प्रयत्न करावेत.
- शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांचा अभ्यासकरुन व त्यांचे गरजेनुसार संशोधन करावे.
- विद्यापीठानी केलेल्या संशोधनाचा अवलंब शेतकऱ्यांनी करावा या दृष्टीने कृषि विभागाने व कृषि विद्यापीठाने प्रयत्न करावेत.
- यांत्रिकीकरण व जैविक किड व्यवस्थापनाचा उपयोग मोठ्या प्रमाणावर करण्यात यावा.
- पौष्टीक तृणधान्य वाणाची निर्मिती करुन ती शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.

विभागीय कृषि संशोधन व विस्तार सल्लागार समितीच्या सभेचा इतिवृत्तांत नोंदविण्याचे कार्य डॉ. ए. के. सदावर्ते, उपसंचालक संशोधन, डॉ. एस. डी. जाधव, सहयोगी प्राध्यापक आणि डॉ. पी. एन. माने, सहाय्यक प्राध्यापक यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. जे. पी. देशमुख, संशोधन उपसंचालक यांनी केले.

सभेमध्ये घेण्यात आलेले निर्णय/ठराव व त्यावर कार्यवाही करणाऱ्या अधिकाऱ्यांचे पदनाम या विषयी माहिती परिशिष्ट-१ मध्ये दिलेली आहे.

सहयोगी संशोधन संचालक,
डॉ, पं. दे. कृ. वि., अकोला

संशोधन संचालक,
डॉ, पं. दे. कृ. वि., अकोला

परिशिष्ट-१

पश्चिम विदर्भ विभागीय संशोधन व विस्तार सल्लागार समितीच्या ६५ व्या सभेतील निर्णय

| अ.क्र. | निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|
| १ | "सुवर्ण शुभ्राचे" या नविन कपाशी वाणाचा बिजोत्पादनाचा कार्यक्रम कृषि विभागामार्फत ज्या शेतकऱ्याकडे सिंचनाची सोय उपलब्ध आहे त्यांचेकडे घेण्यात यावा. | वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ (कापूस) |
| २ | ठिबक सिंचनावर घेण्यात येणाऱ्या कपाशी पिकामध्ये अधिक उत्पादनासाठी आंतरपीक म्हणून कमी कालावधीचे पीक जसे काकडी इत्यादी पिकांचा समावेश करुन प्रयोग घेण्यात यावे. | वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ (कापूस) व विभाग प्रमुख (भाजीपाला) |
| ३ | प्रत्येक गावात शेती शाळेमार्फत शेतकऱ्यांना बिजोत्पादन घेण्यास प्रोत्साहित करावे व पुढील वर्षी ते बियाणे गावातील इतर शेतकऱ्यांना देण्यात यावे. "पीकेव्ही यलोगोल्ड व सुवर्ण सोया" या सोयाबीन वाणांचे बिजोत्पादन कार्यक्रम वाशिम व बुलढाणा येथिल प्रादेशिक संशोधन केंद्रावर व शेतकऱ्यांच्या शेतावर राबविण्यात यावे. | प्रादेशिक संशोधन केंद्र, अमरावती |
| ४ | कोदो, कुटकी व सावा या पिकांचे बियाणे धारणी व चिखलदारा या तालुक्यामध्ये प्रसार करण्याकरिता कृषि सहसंचालक यांना उपलब्ध करुन देण्यात यावे | विभाग प्रमुख, कृषिविद्या व वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ (ज्वारी) जि.अ.कृ.अ., अमरावती |
| ५ | बियाण्यासोबत बिज प्रक्रियेसाठी लागणारे जैविक बुरशीनाशक पुरविण्याबाबतचे पत्र संचालक, महाबीज व आयुक्त (कृषि) यांना मा. कुलगुरु,डॉ. पंदेकृवि, अकोला मार्फत देण्यात यावे. | सहयोगी संशोधन संचालक |
| ६ | कमी पाण्यात उन्हाळी भुईमुगाचे पीक कशा पध्दतीने घेता येईल याबाबत प्रयोग घेण्यात यावे | वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ (तेलबिया) विभाग प्रमुख (कृषिविद्या) |
| ७ | भुईमुग पिकाचे बिजोत्पादन मोठ्या प्रमाणावर घेण्यात यावे | वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ (तेलबिया) |
| ८ | सोयाबीन पिकात आंतरपीक म्हणून तिळ पीक घेता येईल का? या बाबत प्रयोग घेपुन पडताळणी करावी | कृषि विद्यावेत्ता (सोयाबीन) विभाग प्रमुख (कृषिविद्या) |
| ९ | ओवा पिकाचे बियाणे उपलब्ध करुन कृषि विभागाला देण्यात यावे. | कनिष्ठ उद्यान विद्यावेत्ता व पैदासकार भाजीपाला व मिरची संशोधन केंद्र, अकोला |
| १० | अमरवेल या तणाच्या व्यवस्थापनाच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांच्या शेतावर प्रात्यक्षिके घेण्यात यावे. | अ.स.सं. प्र. (तण व्यवस्थापन) |
| ११ | खारपानपट्ट्यामध्ये पटाशी नांगराद्वारे खोल नांगरणीने चर काढुन पाणी जिरविण्या संदर्भात ५० शेतकऱ्यांच्या शेतावर प्रात्यक्षिके घेण्यात यावे. | संचालक, कृषि पध्दती व पर्यावरण केंद्र, अकोला |
| १२ | कापुस पिकामध्ये दुसरी डवरणी झाल्यानंतर पाच किंवा सहा ओळीनंतर सऱ्या काढयाचे प्रात्यक्षिक घेण्यात यावे. | जि.अ.कृ.अ. (सर्व) |
| १३ | शेती शाळेमार्फत घरचे बियाणे घरीच वापरण्या संदर्भात मोठ्या प्रमाणात मोहीम राबविण्यात यावी. | जि.अ.कृ.अ. (सर्व) |
| १४ | खारपाणपट्ट्यातील खाऱ्या पाण्यात मत्स्यपालन व्यवसाय करता येईल का? याबाबत पडताळणी करावी. | जि.अ.कृ.अ. (सर्व) |
| १५ | खारपाणपट्ट्यात जैव विविधतेचा शोध घ्यावा. | जि.अ.कृ.अ. (सर्व) |
| १६ | कांदा पिकाचे बिजोत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांची जिल्हानिहाय यादी माहिती कनिष्ठ उद्यान विद्यावेत्ता व पैदासकार, मिरची व भाजीपाला यांना देण्यात यावी व त्यांनी कांदा बिजोत्पादनाचे तंत्रज्ञान संबंधीत शेतकऱ्यांना उपलब्ध करुन द्यावे. | जि.अ.कृ.अ. (सर्व) कनिष्ठ उद्यान विद्यावेत्ता व पैदासकार भाजीपाला व मिरची संशोधन केंद्र, |

| अ.क्र. | निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|
| १७ | खारपाणपट्ट्यात कांदा बिजोत्पादन करण्याच्यादृष्टीने विभाग प्रमुख, भाजीपाला यांच्या अध्यक्षतेखाली समिती तयार करावी या समितीत सदस्य म्हणून उपविभागीय अधिकारी, मेहकर व दोन शेतकऱ्यांचा समावेश करावा | विभाग प्रमुख, भाजीपाला विभाग, अकोला<br>जि.अ.कृ.अ. बुलढाणा |
| १८ | इतर संलग्न विभागाचे प्रतिनिधी सतत पत्र पाठवून सुध्दा या सभेला उपस्थित नव्हते म्हणून त्या विभागाच्या सचिवांना मा. कुलगुरु मार्फत पत्र देवुन अवगत करण्यात यावे | सहयोगी संशोधन संचालक |
| १९ | मक्यावरील लष्करी अळीच्या व्यवस्थापना संदर्भात जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, बुलढाणा व विभाग प्रमुख, किटकशास्त्र यांनी एकत्रितपणे आराखडा तयार करुन अंमलबजावणी करावी | जि.अ.कृ.अ., बुलढाणा<br>विभाग प्रमुख, किटकशास्त्र |
| २० | शेतकऱ्यांनी स्वतः तयार केलेले पेरणी यंत्राचा अभ्यास करण्यात येऊन त्यात काही सुधारणा करता येईल का? त्यासाठी विभाग प्रमुख, कृषि अवजारे यांच्या अध्यक्षते खालील समिती मार्फत अभ्यास करुन तात्काळ अहवाल देण्यात यावा. | विभाग प्रमुख, कृषि अवजारे |
| २१ | ट्रॅक्टर चलीत तण काढणी यंत्राचे कारंजा तालुक्यात प्रात्यक्षिके घेण्यात यावे | विभाग प्रमुख, कृषि अवजारे |
| २२ | येणाऱ्या हंगामात यवतमाळ व अमरावती या दोन्ही जिल्ह्यात दहा संत्रा फळबागांची निवड करुन इटली वरुन आणलेल्या छाटणी मशीनचे प्रात्यक्षिके घेण्यात यावी. | विभाग प्रमुख, फळशास्त्र विभाग |
| २३ | माती परिक्षणामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात काही बदल झाला का? याबाबत पडताळणी करावी त्याचा सादरीकरणात समावेश करावा | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)<br>कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र (सर्व) |
| २४ | कृषि विद्यापीठाने विकसित केलेल्या पिकांचे वाण व तंत्रज्ञान शेतकरी किती प्रमाणात अवलंब करतात यावर अहवाल सादर करावा. तसेच त्यामुळे उत्पादनात झालेली वाढ याचा सादरीकरणात समावेश करावा. | जि.अ.कृ.अ. (सर्व)<br>कार्यक्रम समन्वयक,कृषि विज्ञान केंद्र (सर्व) |

सहयोगी संशोधन संचालक,
डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला